## संक्षिप्त



### आळंदवाडी शाळेस कुंपण जाळी भेट

**नाशिक :** जिल्हा परिषद शाळा आळंदवाडी, (त्र्यंबकेश्वर) शाळेस यंगर्स क्रिएटिव्ह ग्रुप, नाशिक यांच्या सौजन्याने २०० फूट लांबीचे कुंपण जाळी शाळेस भेट म्हणून देण्यात आली. या कामी यंगर्स क्रिएटिव्ह ग्रुप सदस्य मिलिंद देशपांडे, ज्योती देशपांडे, कुंदन लोहार, नीलिमा लोहार, महेंद्र भामरे, स्मिता भामरे, सुनील पाटील, उज्ज्वला पाटील, संजय कुलकर्णी, स्नेहा कुलकर्णी, विलास खेडकर, राधा खेडकर यांच्यासह विद्यार्थी मंदार, केतकी, आशुतोष, मानस, प्रणव, कीर्तीदा, अदिती, मिताली, प्राची तसेच शाळेचे शिक्षक जितेंद्र गांगुर्डे तसेच मार्तंड जाधव यांच मोलाचे योगदान लाभले.

## निधन



### भिका आहिरे

**सटाणा :** तालुक्यातील रामतीर येथील हभप भिका रुंझू आहिरे (९८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, नातसुना असा परिवार आहे. बागलाण पंचायत समितीचे उपसभापती कान्हू आहिरे व जिभाऊ आहिरे यांचे ते वडील होत.



### सुमनबाई मोरे

**सटाणा :** तालुक्यातील मोरेनगर येथील सुमनबाई बाजीराव मोरे (६६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रगतिशील युवा शेतकरी चंद्रकांत व माणिक बाजीराव मोरे यांच्या त्या मातोश्री होत.



### कारभारी बोरसे

**मेशी :** येथील रहिवासी कारभारी धोंडू बोरसे (९२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ग्रामपंचायत सदस्य संजय बोरसे यांचे ते वडील होत.



### गणपत मिंदे

**त्र्यंबकेश्वर :** तालुक्यातील शिरसगाव (त्र्यंबकेश्वर) येथील प्रगतिशील शेतकरी गणपत बापूजी मिंदे यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले व मुलगी असा परिवार आहे.



### यादवराव काकडे

**नाशिक :** निफाड तालुक्यातील धरणगाव खडक येथील रहिवासी हभप यादवराव रावजी काकडे (९२) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. प्रहार युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष जगन काकडे यांचे ते आजोबा होत.



### आशुतोष दीक्षित

**नाशिक :** एचडीएफसी लिमिटेडमधील अधिकारी आशुतोष सुधाकर दीक्षित (४७) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी, मुलगा असा परिवार आहे.



### निवास गावित

**पेठ :** बोरीचीबारी येथील वैद्य निवास तुकाराम गावित (६०) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सून, नातवंडे, दोन बहिणी, भाऊ असा परिवार आहे. गावित हे जिल्ह्यात नामवंत वैद्य म्हणून परिचित होते.



### वामनराव जाधव

**नाशिक :** वामनराव किसन जाधव (५३) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, चार भाऊ, बहीण, मेहुणे, भाचे, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे.



### द्रौपदाबाई बच्छाव

**नाशिक :** फुले माळवाडी (नामदेववाडी) ता. देवळा येथील द्रौपदाबाई पंढरीनाथ बच्छाव (८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सिडको येथील वृत्तपत्र विक्रेते रघुनाथ (आर. पी.) बच्छाव यांच्या त्या मातोश्री होत.



### सुरेश मोरे

**नांदगाव :** न्यायडोंगरी येथील किराणा मालाचे व्यापारी सुरेश देवचंद मोरे (७२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार किशोर मोरे यांचे ते वडील होत.



### मिलिंद मुळाणे

**सिडको :** गंगापूर रोड परिसरातील रहिवासी मिलिंद उत्तमराव मुळाणे (४५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण असा परिवार आहे.

# साडेसहा हजार टन द्राक्ष नाशिकमधून निर्यात

## युरोपियन देशांमध्येही ४४ कंटेनर रवाना

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

या हंगामात अनेक संकटांचा सामना करीत द्राक्ष उत्पादकांनी निर्यातीचा आलेख चढताच ठेवला आहे. युरोपियन देशांमध्ये कोविड स्ट्रेनमुळे लॉकडाऊन सुरू असले तरी नाशिकमधून आतापर्यंत ४४ कंटेनरमधून द्राक्षांची निर्यात झाली आहे. यामुळे युरोपियन व बिगर युरोपियन देशांमध्ये नाशिकमधून ६,४८७ मेट्रिक टन द्राक्षांची निर्यात झाली आहे.

नाशिक जिल्ह्यात ५८ हजार हेक्टरवर द्राक्षबागा असून, त्यांचा काढणीचा हंगाम साधारणपणे नोव्हेंबरपासून सुरू होतो. कृषी विद्यापीठाच्या निकषानुसार ऑक्टोबर छाटणीपासून द्राक्ष हंगाम सुरू होत असला तरी नाशिक जिल्ह्यात अनेक ठिकाणी जुलैमध्येच छाटणी करून बागा धरल्या जातात. त्यांना प्रचलित भाषेत अर्ली द्राक्षे म्हणून संबोधले जाते. साधारणपणे जुलै ते सप्टेंबर या काळात छाटणी केलेल्या बागांचा काढणीकाळ नोव्हेंबरपासून सुरू होतो. यातील बहुतांश द्राक्षे ही बिगर युरोपियन देशांमध्ये निर्यात होत असतात, तर युरोपियन देशांमध्ये जानेवारीपासून निर्यात सुरू होते. एखादा अपवाद वगळला तर द्राक्ष उत्पादकांना दरवर्षी अवकाळी पाऊस, गारपीट अथवा थंडीच्या लाटेचा फटका बसतो. यावर्षीही डिसेंबर व जानेवारीमध्ये अवकाळी पावसाने द्राक्ष उत्पादकांचे मोठे नुकसान केले असले तरी त्या संकटावरही मात करून द्राक्ष उत्पादकांनी निर्यातक्षम द्राक्षांचे उत्पादन घेतले आहे. यावर्षी द्राक्ष निर्यातीसाठी ३७,०९० शेतकऱ्यांनी २२,८७० हेक्टरवरील द्राक्षबागांची निर्यातीसाठी नोंदणी केलेली आहे.

मागील वर्षी २८ हजार शेतकऱ्यांनी १८ हजार हेक्टरवरील बागांची नोंदणी केली होती. मागील वर्षी ऑक्टोबर व नोव्हेंबरच्या अवकाळी पावसामुळे या नोंदणीवर परिणाम झाला होता. तरीही वर्षभरात जवळपास १,२६,००० मेट्रिक टन द्राक्षांची निर्यात झाली होती. यावर्षी वाढलेली नोंदणी बघता द्राक्षांची नोंदणी वाढू शकते, असा अंदाज व्यक्त होत आहे.




### कोरोनाचा यंदाही काहीसा फटका

नाशिक जिल्ह्यातून युरोपियन देशांसाठी द्राक्ष निर्यात सुरू झालेली असतानाच युरोपमध्ये विशेषत: इंग्लंडमध्ये लॉकडाऊन सुरू झाले. मागील वर्षीही कोरोनामुळे झालेल्या लॉकडाऊनचा द्राक्ष निर्यातीला फटका बसला होता. यंदाच्या लॉकडाऊनमध्ये तेथील सुपर मार्केट उघडे राहणार असल्याने द्राक्ष निर्यात सुरू राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तरीही लॉकडाऊनमुळे द्राक्षांच्या दराला फटका बसण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. आतापर्यंत युरोपमध्ये ४४ कंटेनरमधून ५७३ मेट्रिक टन द्राक्षे निर्यात झाली आहेत, तर बिगर युरोपियन देशांमध्ये ५,९१४ मेट्रिक टन द्राक्षे निर्यात झाली आहेत.

# मराठीचे नाते नव्या माध्यमविश्वाशी जोडा

## प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांचे प्रतिपादन

**चांदवड : पुढारी वृत्तसेवा**

आपल्या भाषिक क्षमतांचा विकास करणे, मराठी भाषिक कौशल्ये विकसित करणे, विविध क्षेत्रांतील व्यवसायाच्या संधींची माहिती करून घेणे आणि मराठी भाषेची व्यवहारातील उपयुक्तता आणि वैशिष्ट्ये यांची ओळख विद्यार्थ्यांना होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांनी केले.

येथील आबड-लोढा-जैन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या आणि मराठी भाषा विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत व्याख्यानमालेच्या बीजभाषणप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. एच. जैन होते. उद्घाटन



ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र मलोसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मलोसे यांनी आपण प्रत्यक्ष व्यवहारात कशा प्रकारे मराठी शब्दांच्या ऐवजी इंग्रजी शब्द वापरतो त्याचे उदाहरणासह स्पष्टीकरण केले. ज्येष्ठ स्तंभलेखक विजय निपाणीकर यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व स्पष्ट केले.

अध्यक्ष मनोगतात प्राचार्य डॉ. जी. एच. जैन यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. तुषार चांदवडकर यांनी केले. यावेळी प्रा. गणेश आहेर यांनी परिचय करून दिला. आभार उपप्राचार्य डॉ. दत्ता शिंपी यांनी मानले.






नांदगाव : नवनिर्वाचित उपसभापती राजेंद्र देशमुख यांचा सत्कार करताना आमदार सुहास कांदे, बापूसाहेब कवडे, विलास आहेर, तेज कवडे, किरण देवरे, श्रावण काळे आदी. (छाया : मारुती जगधने)

# नांदगाव बाजार समिती सभापतिपदी राजेंद्र देशमुख बिनविरोध

**नांदगाव : पुढारी वृत्तसेवा**

नांदगाव बाजार समिती उपसभापतिपदी हिसवळ (बु.) येथील राजेंद्र देशमुख यांची बिनविरोध निवड झाली. तत्कालीन उपसभापती एकनाथ सदगीर यांनी रोटेशननुसार राजीनामा दिल्याने रिक्त जागेसाठी गुरुवारी विशेष सभा घेण्यात आली.

निवडणूक प्रक्रियेत राजेंद्र सुदामराव देशमुख यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक निबंधक पी. जी. देवरे यांनी जाहीर केले. सूचक म्हणून संचालक भरत शेलार यांनी स्वाक्षरी केली. निवडीपूर्वी संचालक मंडळाची शिवसेना कार्यालयात बैठक होऊन आमदार सुहास कांदे व ज्येष्ठ नेते बापूसाहेब कवडे यांनी राजेंद्र देशमुख यांच्या नावावर एकमत झाले. त्यानंतर निवडणूक प्रक्रिया पार पडली. निवडणुकीवेळी सभापती तेज कवडे, मावळते उपसभापती एकनाथ सदगीर, संचालक विलास आहेर, पुंजाराम जाधव, दत्तात्रय निकम, दिलीप पगार, भाऊसाहेब हिरे, श्रावण काळे, नंदू खरात, भास्कर कासार, भाऊसाहेब सदगीर, यज्ञेश कलंत्री, प्रफुल्ल पारख, सरला दिवटे, अलका कवडे, मंगला काकळीज, सचिव अमोल खैरनार यांच्यासह शिवसेना तालुकाप्रमुख किरण देवरे, जि. प. सदस्य रमेश बोरसे, मजूर फेडरशेनचे संचालक प्रमोद भाबड, शिवसेना नेते संतोष गुप्ता, माजी पं. स. सभापती सुधीर देशमुख, संजय आहेर, बाळासाहेब आव्हाड, बाळासाहेब कवडे, अमोल नावंदर, हिसवळचे सरपंच बाळासाहेब बेंडके, चेअरमन संजय चव्हाण, फकिरा जगताप, संजय पल्हाळ, कल्याणराव देशमुख, भय्यासाहेब देशमुख, श्रावण भालेराव, प्रकाश कापसे, मनोहर बिन्नर, देवराम फटांगरे, चांगदेव करवर, चिंधू सदगीर यांच्यासह शेतकरी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीबद्दल आ. सुहास कांदे, बापूसाहेब कवडे यांनी अभिनंदन केले.

# नांदगावला 'सेवाग्राम'चा थांबा

**नांदगाव :** नागपूर-मुंबई सेवाग्राम गाडीचा नांदगाव स्थानकावर गुरुवार(दि. २१)पासून थांबा नियमित झाला असून, यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय दूर झाली आहे. याबाबत नागरिकांनी आंदोलन करून गाडीचा थांबा नियमित करण्याची मागणी केली होती.

लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर रेल्वे प्रशासनाने 'कोविड स्पेशल' गाड्या सुरू केल्या आहेत. या सर्व गाड्यांच्या नंबरच्या आधी शून्य असा आकडा टाकून बदल केला आहे. या सर्व गाड्यांना नांदगाव स्थानकावर कोरोनापूर्व काळात थांबे देण्यात आले होते. मात्र, 'कोविड स्पेशल रेल्वे' असे नामकरण केलेल्या गाड्यांना थांबे दिले नव्हते. यामुळे नांदगावकरांनी बंद पुकारून आपला रोष व्यक्त केला होता. बंदची दखल घेत खा. डॉ भारती पवार यांनी मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांकडे किमान ३ ते ४ गाड्या थांबवा, अशी मागणी केली होती. दरम्यान, टप्प्याटप्प्याने पुढील गाड्यांचे थांबेदेखील दिले जाणार असल्याचे आश्वासन रेल्वे महाव्यवस्थापकांनी दिले असल्याची माहिती खा. डॉ. भारती पवार यांनी दिली.


## मालमत्तेची ऑनलाईन लिलाव विक्री

kotak Kotak Mahindra Bank

**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी २७, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई, महाराष्ट्र, पिनकोड - ४०० ०५१**

**शाखा कार्यालय : 'पायस', १ला मजला, क्रोमा शोरूमसमोर, थत्ते नगर, नाशिक- ४२२००५**

### स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

**सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२च्या नियम ८(५)च्या तरतुदींसह नियम ९(१)च्या तरतुदींनुसार स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना**

सिटी फायनान्शियल कन्झुमर फायनान्स इंडिया लिमिटेड (सीसीएफआयएल)यांनी कोटक महिंद्रा बँक लिमिटेडकडे **कर्ज** सोपवले आहे, पहा **असाईन्मेंट अ‍ॅग्रीमेंट दिनांक ३१.१०.२०१२ आणि** इथे सर्वसाधारण लोकांना आणि विशेष करून कर्जदार आणि जामीनदारांना, ज्यांचे तपशील खाली दिलेल्या तक्त्यात दिली आहे, इथे सूचना देण्यात येते की खाली वर्णन करण्यात आलेली स्थावर मालमत्ता सिक्युअर्ड क्रेडीटर यांच्याकडे गहाण/चार्ज्ड असून **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड** सिक्युअर्ड क्रेडीटरचे अधिकृत अधिकारी यांनी तिचा **२४.०९.२०१४** प्रत्यक्ष ताबा घेतला असून तिची 'जिथे आहे ते', 'जे आहे ते' आणि 'जे काही ते' बेसिसवर १०.२.२०२१ रोजी सकाळी **११.०० ते दुपारी १२.००** दरम्यान ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह **श्री. संजय मातादीन प्रजापती आणि सौ. नूतन प्रजापती** कर्ज खाते क्र. **१५१००४४६ आणि १५१००४८६ यांच्याकडून १६/०१/२०२१** प्रमाणे कोटक महिंद्र बँक लिमिटेडला देय असलेली **रू. ३६,३८,६८०/-** या रकमेची आतापर्यंतच्या लागू कराराप्रमाणे व्याजासहीत वसुली करण्यासाठी विक्री करण्यात येणार आहे. राखीव मूल्य रु. २४,५०,०००/- (रुपये चोवीस लाख पन्नास हजार फक्त) आणि बयाणा रक्कम रु. २,४५,०००/- (रुपये दोन लाख पंचेचाळीस हजार फक्त) आणि

**केवायसीसहित बयाणा रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक :** ९.०२.२०२१ सायं. ५.०० वाजेपर्यंत (भारतीय प्रमाण वेळ)

**मालमत्तेचे वर्णन :** गाव नासिक शिवार नासिक महानगरपालिका तसेच नासिक शहर एकत्रीकरण विभाग आणि जिल्हा नासिक उप विभाग तालुका नासिक येथे स्थित असलेल्या सर्वे क्र. ७६१/२/३, प्लॉट क्र. ए १४ मोजमाप २४१.१५ चौ. मी. आणि प्लॉट क्र. ए १५ मोजमाप २४९.२५ चौ. मी. एकूण मोजमाप ४९८.४० चौ. मी. वर बांधण्यात आलेल्या ओम श्री गुरूदेव को-ऑपरेटीव हाऊसिंग सोसायटी लि. नासिक या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील फ्लॅट क्र. ३०३, तिसरा मजला, मोजमाप ९६० चौ. फूट म्हणजे ८९.२१ चौ. मी. बिल्ट अप क्षेत्र. या स्थावर मालमत्तेचा एकूण एक भाग. त्याची चतु:सीमा : पूर्व : प्लॉट क्र. ९ ए आणि ८, पश्चिम : कॉलनी रोड, दक्षिण : कॉलनी रस्ता, उत्तर : मोकळी जागा.

सर्वसाधारण लोक आणि विशेष करून कर्जदार यांनी कृपया नोंद घ्यावी की जर कोणत्याही कारणाने इथे निर्दिष्ट करण्यात आलेला लिलाव झाला नाही तर सिक्युअर्ड क्रेडीटर खासगी कराराच्या माध्यमातून विक्रीद्वारे सिक्युरिटी व्याज वसूल करतील.

कर्जदारांचे कायद्याच्या कलम १३च्या उपकलम ८ कडे लक्ष वेधण्यात येते आहे, ज्यानुसार उपलब्ध वेळेत ते गहाण मालमत्ता सोडवून घेऊ शकतात.

विक्रीसाठी असलेल्या मालमत्तांसंदर्भात काही स्पष्टीकरण हवे असल्यास बिडरनी **श्री. अमीत बैरागी (+९१ ९६०७९५४२०२), श्री. गुरपाल सिंग (+९१ ९५९२९२१११४, +९१७८८४३०२५०), श्री. राजेंद्र दहिया (+९१ ८४४८२६४५१५) आणि श्री. आकाश सक्सेना (+९१ ८८६०००१९१०)** यांच्याशी संपर्क करावा.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया HTTPS://WWW.KOTAK.COM/EN/BANK-AUCTIONS.HTML ही कोटक महिंद्र बँक वेबसाईटद्वारे म्हणजे WWW.KOTAK.COM द्वारे पुरवलेली लिंक पहावी आणि/किंवा HTTPS://KOTAKBANK.AUCTIONTIGER.NET पहावी.

**ठिकाण : नासिक**
**दिनांक : २२.०१.२०२१**

**अधिकृत अधिकारी**
**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**


# नियोजनाची मुदत टळल्याने अधिकार अध्यक्षांकडे?

## जिल्हा परिषद स्थायी समितीच्या ठरावाची अंमलबजावणी होण्याची चर्चा

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

जिल्हा परिषदेच्या डिसेंबरमधील स्थायी समितीच्या सभेत १५ जानेवारीपर्यंत नियोजन न केल्यास त्याचे अधिकार जिल्हा परिषद अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात यावा, असा ठराव केला होता. या ठरावानंतरही अद्याप जिल्हा परिषदेच्या कोणत्याही विभागाचे नियोजन झाले नाही. यामुळे स्थायी समितीच्या ठरावाची अंमलबजावणी होणार की ठराव हवेत विरणार, याची उत्सुकता लागली आहे.

'कोविड १९'च्या जागतिक महामारीमुळे २०२०-२१ या आर्थिक वर्षात नियतव्यय मंजूर होऊनही सरकारने केवळ ३३ टक्के निधी वितरणाचा व त्यातही आरोग्य विभागासाठीच निधी देण्याचे धोरण ठरवले. यामुळे जिल्हा परिषदेत यावर्षी कोणत्याही नवीन कामांचे नियोजन केले जात नव्हते. सर्वांना सरकारने १०० टक्के निधी वितरणास परवानगी द्यावी, याची प्रतीक्षा होती. त्यानंतर राज्य सरकारने जिल्हा नियोजन समित्यांना १०० टक्के निधी वितरणाची परवानगी दिली. नियोजनासाठी केवळ चार महिने उरलेले असल्याने या निधीचे नियोजन वेळेवर व्हावे, अशी सर्वच सदस्यांची भावना आहे. स्थायी समितीच्या मासिक सभेत या भावनेचे प्रतिबिंब उमटून राष्ट्रवादीचे सदस्य महेंद्रकुमार काले यांनी १५ जानेवारीपर्यंत नियोजन करावे; अन्यथा निधी नियोजनाचे सर्व अधिकार अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना द्यावेत, असा ठराव मांडला. शिवसेनेच्या सविता पवार यांनी या ठरावास अनुमोदन दिले. या ठरावानंतर सर्वच विभागप्रमुख व सभापतींनी नियोजनास सुरुवात केली. मात्र, १५ जानेवारीपर्यंत एकाही विभागाचे नियोजन झाले नाही. त्यानंतर आठवडा उलटूनही अद्याप प्रस्ताव मागवणे सुरू असल्याचे दिसत आहे. आता हे आर्थिक वर्ष संपण्यास केवळ दोन महिने उरले असतानाही अद्याप नियोजन झालेले नाही.

यामुळे सरकारकडून १०० टक्के निधी वितरणास परवानगी दिली असली तरी त्याबाबत जिल्हा परिषदेने अद्याप नियोजन केलेले नाही. निधी नसताना निधी येण्यासाठी उत्सुक असलेले प्रशासन व पदाधिकारी प्रत्यक्ष नियोजनाच्या वेळी चालढकल करीत असल्याचे दिसून आले. आता जिल्हा परिषद अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी स्थायी समितीच्या ठरावाची अंमलबजावणी करतात की नाही, याची उत्सुकता जिल्हा परिषद वर्तळात लागली आहे.

### दोन टप्प्यांत नियोजन?

कामांचे नियोजन करताना सरकारने वेगवेगळ्या शासन निर्णयांद्वारे काही निकष ठरवून दिले आहेत. त्यानुसार नियोजन केल्यास पदाधिकाऱ्यांना त्यांच्या सोयीने नियोजन करता येत नाही. यामुळे यंदा नियोजन दोन टप्प्यांत करण्याचा निर्णय सर्वच विभागांनी घेतल्याचे दिसत आहे. त्यानुसार आलेल्या नियतव्ययाच्या ५० ते ७० टक्के नियोजन पहिल्या टप्प्यात करायचे. त्यात सर्व सदस्यांच्या मागणीनुसार समान कामे द्यायची. त्यानंतर उर्वरित निधीचे नियोजन करून संबंधित सभापती, अध्यक्ष व काही सदस्यांमध्ये ती कामे विभागून घ्यायची, असा यामागचा हेतू असल्याची चर्चा आहे. यामुळे नियोजन करण्यास उशीर होत असल्याचेही सांगितले जात आहे.

